# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- राष्ट्र प्रथम हे आपल्या सरकारच्या विकासाचं मॉडेल - पंतप्रधानांचं प्रतिपादन
- मराठवाड्याची दुष्काळवाडा ही ओळख दूर करायची असल्याचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नांदेड इथल्या सभेत निर्धार
- धाराशिव इथं उमेद अभियानाअंतर्गत महिला बचत गट उत्पादित वस्तूंच्या प्रदर्शनाचं उद्घाटन

आणि

- नागपूर इथं सुरु असलेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडचं भारतासमोर २४९ धावांचं आव्हान

****

राष्ट्र प्रथम हे आपल्या सरकारच्या विकासाचं मॉडेल असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राज्यसभेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. या विकासाच्या मॉडेलला देशातल्या जनतेनं समर्थन दिल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं, ते म्हणाले –

> ***2014 के बाद देश ने हमें सेवा करने का अवसर दिया। देश दुसरी बार, तिसरी बार हमे सेवा करने का मुहुरत बनाती है इसका कारण देश की जनता ने हमारे विकास के मॉडेल को परखा है। समझा है। और समर्थन दिया है।***

राष्ट्रपतींचं अभिभाषण भविष्यासाठी मार्गदर्शक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. केंद्र सरकारने कौशल्य विकास, आर्थिक समावेशन आणि औद्योगिकीकरणावर लक्ष

केंद्रित केल्याचं सांगून त्यांनी, मुद्रा योजना, गरीबांना आरक्षण, शिक्षण, रोजगार अशा अनेक मुद्यांवर भाष्य केलं.

पंतप्रधानांनी `विकसित भारत' वर भर देऊन, २५ कोटी नागरिकांना गरिबीतून बाहेर काढण्याच्या, घटनात्मक मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेचे समर्थन करणाऱ्या सरकारचा परिवर्तनीय प्रवास अधोरेखित केला.

यानंतर राज्यसभेत धन्यवाद प्रस्ताव संमत करुन कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

****

दरम्यान, अमेरिकेतून भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्यावरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे संसदेच्या कामकाजात आज व्यत्यय आला. लोकसभेचं कामकाज आज दिवसभरात तीनदा तहकूब झालं.

राज्यसभेत या मुद्यावर विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर स्पष्टीकरण देताना, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी, आपले नागरिक इतर देशात बेकायदेशीररित्या राहत असतील तर त्यांना परत आणणं हे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये सामान्यपणे स्वीकारलेलं तत्व असल्याचं नमूद केलं. बेकायदेशीररित्या राहणाऱ्या नागरिकांना हद्दपार करण्याची प्रक्रिया नवीन नसून, ही सामान्य प्रक्रिया असल्याचं त्यांनी सांगितलं. काही भारतीय नागरिक अमेरिकेत बेकायदेशीररीत्या राहत असल्याचं जयशंकर यांनी कबूल केलं.

****

परीक्षा पे चर्चा कार्यक्रम येत्या दहा फेब्रुवारीला नवी दिल्ली इथं भारत मंडपमध्ये आयोजित करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध क्षेत्रातले तज्ज्ञ या कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचं निराकरण करतील. ३६ विद्यार्थी पंतप्रधानांसोबत थेट संवाद साधणार आहेत. यावर्षी विविध माध्यमांतून सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची विक्रमी संख्या पाच कोटी एवढी आहे.

****

मराठवाड्याची दुष्काळवाडा ही ओळख दूर करायची असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. नांदेड इथं जाहीर सभेत ते आज बोलत होते. ज्या योजना लोकहिताच्या आहेत त्या कुठलंही सरकार आलं तरीही बंद करता कामा नये, असं त्यांनी नमूद केलं. विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातल्या

नागरीकांनी महायुतीला जिंकून दिल्याबद्दल शिंदे यांनी आभार मानले. गेल्या अडीच वर्षात युती सरकारने केलेल्या विविध कामांची त्यांनी यावेळी माहिती दिली.

****

अंगणवाडी भरती प्रक्रियेत कोणत्याही आमिषाला बळी पडू नका असं आवाहन महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलं आहे. एकात्मिक बाल विकास सेवा पर्यवेक्षकीय अधिकारी, संरक्षण अधिकारी, अधीक्षक ही पदे भरण्यात येत आहे. भरती प्रक्रिया अतिशय पारदर्शक पद्धतीने होणार असल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

****

राज्यात अतिवृष्टी, गारपीट, पूर, दुष्काळ, या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकरी आणि अन्य घटकांना राज्य शासनाने ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार रुपयांची मदत दिली असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी दिली. पाच लाख ३९ हजार ६०५ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात चार लाख ८३ हजार ८८३ लाभार्थींना ५१४ कोटी ८५ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे.

****

पक्ष आणि सरकार यामधलं समन्वय साधण्यासाठी ज्या ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे पालकमंत्री नाहीत, त्या सतरा जिल्ह्यांमध्ये पक्षानं जिल्हा संपर्कमंत्री नियुक्त केले आहेत. यामध्ये अतुल सावे यांची छत्रपती संभाजीनगर, पंकजा मुंडे बीड, जयकुमार गोरे धाराशिव, मेघना बोर्डीकर यांची हिंगोली जिल्ह्याच्या संपर्क मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

****

राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन सचिव संजय सेठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी या पदावर लोकप्रतिनिधींची नियुक्ती होत होती, मात्र प्रथमच ही जबाबदारी एका सनदी अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे. सेठी यांच्याआधी शिवसेना नेते भरत गोगावले हे महामंडळाचे अध्यक्ष होते. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातल्या राज्य सरकारमध्ये गोगावले यांचा समावेश झाल्यानंतर त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता, त्यामुळे हे पद रिक्त होतं.

****

धाराशिव इथं महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अभियानाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या महिला बचत गट उत्पादित वस्तूंच्या प्रदर्शनाचं उद्घाटन आज पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून झालं. महिला बचत गटाच्या माध्यमातून जिल्ह्यातल्या महिलांनी आपली प्रगती करून आत्मनिर्भर व्हावं, असं आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केलं. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यावेळी उपस्थित होते. या प्रदर्शनाबद्दल माहिती देताना ते म्हणाले –

> ***आमच्याकडे याठिकाणी आज दीडशे स्टॉल्स उपलब्ध आहेत. आणि फक्त धाराशिव जिल्ह्यातलं नाही तर बाहेरच्या जिल्ह्यातील पण जवळजवळ पंधरा स्टॉल्स येऊन याठिकाणी सहभागी झालेले आहेत. आमचं टार्गेट जवळपास वीस लाख आहे. पण आमची एक्सपेक्टेशन आहे की वीस लाखाच्या पलिकडे जाऊन जवळपास यावेळेस पंचवीस लाख या वेळेस आम्ही रीच करू.***

यावेळी उमेद अभियानाच्या उपक्रमांना इलेक्ट्रॉनिक्स मीडियातून व्यापक प्रसिद्धी दिल्याबद्दलचा २०२०–२१ चा राजमाता जिजाऊ स्वावलंबन इलेक्ट्रॉनिक्स मीडिया उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार आकाशवाणी, दूरदर्शनचे वार्ताहर देविदास पाठक यांना प्रदान करण्यात आला. तसंच उत्कृष्ट काम करणाऱ्या महिला बचत गटांना देखील राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

****

पुरूष क्रिकेटमध्ये नागपूर इथं सुरु असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडने भारतासमोर २४९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. प्रथम फलंदाजी करत इंग्लंडचा संघ ४८व्या षटकात २४८ धावांवर सर्वबाद झाला. हर्षित राणा आणि रविंद्र जडेजानं प्रत्येकी तीन, तर मोहम्मद शमी, अक्षर पटेल आणि कुलदीप यादवनं प्रत्येकी एक गडी बाद केला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या दोन बाद १९ धावा झाल्या होत्या.

****

ज्येष्ठ क्रीडा आणि चित्रपट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं आज प्रदीर्घ आजारानं निधन झालं, ते ७४ वर्षांचे होते. त्यांच्यावर मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. संझगिरी हे मुंबई महापालिकेत मुख्य अभियंता म्हणून

कार्यरत होते. क्रीडा आणि चित्रपट या विषयांवरील त्यांचं समीक्षण वाचकांच्या विशेष पसंतीला उतरलं. संझगिरी यांच्या पार्थिवावर उद्या दुपारी १२ वाजता दादर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संझगिरी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

दहावी आणि बारावीच्या राज्य मंडळाच्या परीक्षा येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. परीक्षा काळात विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी राज्य मंडळस्तरावर समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती राज्य मंडळ सचिव डॉ.माधुरी सावरकर यांनी दिली. सकाळी ८ ते रात्री ८ या कालावधीत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीद्वारे निःशुल्क आवश्यक ते समुपदेशन मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

नांदेडचे जिल्हाधिकारी म्हणून राहुल कर्डिले यांनी आज पदभार स्वीकारला. नांदेडचे मावळते जिल्हाधिकारी अभिजीत राऊत छत्रपती संभाजीनगर इथं वस्तू आणि सेवा कर विभागाचे सहआयुक्त म्हणून पदभार स्वीकारणार आहेत.

****

बीड जिल्ह्यातल्या रेल्वे प्रकल्प क्षेत्रातल्या शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी संयुक्त बैठक घेणार असल्याचं माजी खासदार डॉ.प्रीतम मुंडे यांनी सांगितलं आहे. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गासाठी केलेल्या भूसंपादन प्रक्रियेमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांची आज मुंडे यांनी माजलगाव, वडवणी, किल्ले धारूर इथं भेट घेतली, त्यानंतर त्या बोलत होत्या.

****

नाशिकमधून आठ बांगलादेशी मजुरांना अटक करण्यात आली. शहरातल्या आडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका बांधकाम स्थळावर हे मजूर काम करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या बांग्लादेशींकडून आधार कार्ड, पॅनकार्डसारख्या भारतीय कागदपत्रांसह बांगलादेशचं स्मार्ट कार्ड देखील जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिली.

****

जागतिक महिला दिनानिमित्त येत्या आठ मार्चला बीड इथं तुलसी शैक्षणिक समुहाच्या वतीनं महिला मॅरेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. पाच किलोमीटर अंतर असलेल्या या मॅरेथॉनमधल्या विजेत्यांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

****